**जिल्हा दंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे कार्यालय**
**स्वराज्य भवन,नागाळा पार्क,कोल्हापूर**

जा.क्र.नैआ/पुरवठा शाखा /कोरोना/विषाणू/228/2020 दिनांक -25/03/2020

**वाचले:-**

1.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 30,33,34,41,51
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्रं.2020/प्र.क्र.58अरोग्य/5/दिनांक 13 मार्च 2020
3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडीलअधिसुचना क्रं.2020/प्र.क्र.58अरोग्य/5/दिनांक 14 मार्च 2020
5.भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
6.फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144(1)(3)

**विषय:- पेट्रोल/डिझेल पुरवठा फक्त अत्यावश्यक सेवांसाठीच करणेबाबत.**

## :-आदेश:-

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करणेत आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भीय 2 अन्वये करोना विषाणूचा (कोव्हीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 लागु करून खंड 2, 3 व 4 मधील तरतुदीची अमंल बजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय 3 अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी गर्दी टाळण्यासाठी पार्श्वभूमीवर परस्पर संपर्कामुळे या विषाणूचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जिवीताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होऊ शकते याची माझी खात्री झालेली आहे. यापूर्वी नागरिकांनी कामाशिवाय घराच्या बाहेर पडू नये असे वारंवार आदेशित करूनही रस्त्याने नागरिक वाहनांने ये-जा करत आहेत. सबब कोल्हापूर जिल्हयामध्ये पेट्रोल/डिझेल विक्री केंद्रावर ग्राहकांना पेट्रोल व डिझेल विक्री करणेबाबत निर्बंध घालणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाचे संदर्भिय 1 व 2 अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकराचा वापर करून मी दौलत देसाई जिल्हाधिकारी कोल्हापूर, जिल्हयातील कोरोना विषाणूचा (कोव्हीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्गात वाढ न होऊ देण्यासाठी व अत्यावश्यक कारणा व्यतिरिक्त इतर कोणतेही वाहन रस्त्यावर न येण्यासाठी, पेट्रोलपंपावर पेट्रोल/डिझेल भरण्यासाठी येणा-या दुचाकी/तीनचाकी/चारचाकी वाहनांमध्ये पेट्रोल/डिझेल व इतर इंधन भरणा करणेस मनाई करीत आहे. तथापि खालील वाहनांना या बंदीतून सूट देण्यात आली आहे.

1. अत्यावश्यक सेवेसाठी कार्यरत असणारी सर्व शासकीय वाहने (ओळखपत्र व वाहन परवाना असल्यास)
2. कोरोना विषाणु प्रतिबंधक उपाय योजनेसाठी, वस्तु व सेवा पुरवठा करणारी खाजगी वाहने (वाहन परवाना असल्यास)
3. तातडीची गरज, वैद्यकीय उपचार किंवा सहाय्यासाठी वापरण्यात येणारी वाहने (वाहन परवाना असल्यास)
4. सर्व ॲम्ब्युलन्सेस, आरोग्य सेवेवरील शासकीय वाहने, पोलीस वाहने, डी.व्ही.कार, न्यायाधिश, तहसिलदार, उपविभागीय दंडाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांची वाहने.

सदर निर्बंध पुढील आदेश होईपर्यंत लागु राहतील.

MAGISTRATE OF THE DISTRICT जिल्हा दंडाधिकारी कोल्हापूर KOLHAPUR

[दौलत देसाई]
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,कोल्हापूर

**प्रति,**

1) श्री. गजकुमार माणगांवे, अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा पेट्रोल पंप असोसिएशन

Scanned by CamScanner

2) श्री. हर्षद कुंभार, सेल्सऑफिसर, एच.पी.सी.एल.

3) श्री. मनोज गुप्ता, सेल्सऑफिसर, बी.पी.सी.एल.

4) श्री.चंद्रभान नंदनकर, सेल्स ऑफिसर आय.ओ.सी.एल

5) श्री. प्रकाश महाले, रिलायन्स इंडस्ट्रीज

6) श्री. महेश तोष्णीवाल, सेल्स ऑफिसर एस्सार डीलर्स

**प्रत,** माहिती व उचित कार्यवाहीसाठी

1) आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका

2) पोलिस अधिक्षक, कोल्हापूर

3) उपविभागिय अधिकारी सर्व

4) तहसिलदार सर्व

5) विभाग प्रमुख (सर्व)

6) अन्नधान्य वितरण अधिकारी, कोल्हापूर शहर

MAGISTRATE OF THE DISTRICT
डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट
कोल्हापूर
KOLHAPUR

[दौलत देसाई]
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,कोल्हापूर

Scanned by CamScanner